# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date: 18 May 2024
# Time: 7.10 AM to 7.20 AM
# Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक: १८ मे २०२४ सकाळी ७.१० मि.

****

*ठळक बातम्या*

- **लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातल्या प्रचाराचा आज अखेरचा दिवस**
- **मुंबईत महायुती तसंच महाविकास आघाडीच्या सभांमधून आरोप प्रत्यारोपाच्या फैरी**
- **वडिलोपार्जित शेतीसाठी दोन भावांसह चौघांची हत्या करणाऱ्या बहिणीसह तिघांना फाशी**
- **अवैध गर्भपात प्रकरणी छत्रपती संभाजीनगर इथं दोन वेगवेगळ्या गुन्ह्यांत चौघांना अटक**

**आणि**

- **थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष आणि महिला दुहेरीत भारतीय जोड्या उपांत्य फेरीत दाखल**

***सविस्तर बातम्या***

लोकसभा निवडणुकीच्या राज्यातल्या शेवटच्या टप्प्याच्या प्रचाराची आज सांगता होत आहे. राज्यात उत्तर मुंबई, उत्तर मध्य मुंबई, दक्षिण मुंबई, दक्षिण मध्य मुंबई, वायव्य मुंबई, ईशान्य मुंबई, धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण आणि ठाणे या १३ जागांवर परवा २० मे रोजी मतदान होणार आहे.

मुंबईतल्या सर्व उमेदवारांसाठी भाजप नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल मुंबईत शिवाजी पार्क मैदानावर सभा घेतली. महायुतीच्या नेत्यांसह महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यावेळी उपस्थित होते. आपण देशवासियांच्या हाती

विकसित भारत सोपवणार असल्याचं मोदी यावेळी म्हणाले. राम मंदिर, तीन तलाक, महिलांना संसदेत आरक्षण, दहशतवाद निर्मुलन, आदी मुद्यांवर त्यांनी भाष्य केलं. कलम ३७० चा उल्लेख करत, कोणतीही शक्ती काश्मीरमध्ये कलम ३७० पुन्हा लागू करू शकणार नसल्याचं मोदी यांनी नमूद केलं.

राज ठाकरे यांनी आपल्या भाषणात मराठी भाषेला अभिजात दर्जा, मराठा साम्राज्याच्या इतिहासाचा देशस्तरावर शालेय अभ्यासक्रमात समावेश, आदी मुद्यांचा उल्लेख केला. मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांच्यासह अनेक मान्यवरांनी या सभेला संबोधित केलं.

आपल्या मुंबई दौऱ्यात मोदी यांनी चैत्यभूमीवर जाऊन भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीला अभिवादन केलं. तसंच शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिस्थळावर जाऊन त्यांना पुष्पांजली अर्पण केली.

दरम्यान, वांद्रे कुर्ला संकुल –बीकेसीच्या मैदानावर महाविकास आघाडीची काल सायंकाळी सभा झाली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी या सभेत बोलताना मोदी सरकारच्या धोरणांवर टीका केली. लोकशाही आणि संविधान संकटात असताना आपण सर्वांनी एकत्र राहायला हवं, असं ते यावेळी म्हणाले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी यावेळी बोलतांना, या निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रचाराची दिशा सापडत नसल्याची टीका केली. मुंबई आणि महाराष्ट्रातले अनेक उद्योगधंदे गुजरातला नेल्याचा आरोपही त्यांनी केला. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचीही या सभेत भाषणं झाली.

****

धुळे लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार डॉ. शोभा बच्छाव यांच्या प्रचारार्थ खा. डॉ अमोल कोल्हे यांनी काल धुळ्यात सभा घेतली. तर भाजप महायुतीचे उमेदवार डॉ.सुभाष भामरे यांच्या प्रचारार्थ शिंदखेडा इथं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सभा घेतली.

****

राज्यात आतापर्यंतच्या टप्प्यात मतदान झालेल्या सर्व मतदारसंघातली मतदान यंत्र सुरक्षित असल्याचं, राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी स्पष्ट केलं आहे. ते काल मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. मतदान यंत्र सुरक्षितरित्या ठेवलेली ठिकाणं उमेदवारांच्या स्वाक्षरीनं सीलबंद केलेली असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. सर्व ठिकाणांच्या सीसीटीव्हीचं रेकॉर्डिंग सुरू असून, फक्त सीसीटीव्हीचे स्क्रीन बंद झाले होते, असा खुलासा त्यांनी केला.

****

छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दिलीप स्वामी यांनी, मतदान यंत्रं ठेवलेल्या स्ट्राँग रूमची तसंच मतमोजणी केंद्राची काल पाहणी केली. शहरातल्या एमआयटी महाविद्यालयात ही स्ट्राँग रूम तसंच मतमोजणी केंद्र उभारण्यात आलं आहे. याठिकाणी केंद्रीय सशस्त्र पोलीस दल, राज्य राखीव पोलीस दल आणि राज्य पोलीस दल, अशी त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे.

****

**या बातम्या आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरून देत आहोत**

****

वडिलोपार्जित शेतीसाठी दोन भाऊ आणि त्यांच्या दोन मुलांची हत्या करणाऱ्या महिलेसह तिघांना अकोल्याच्या अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायालयानं फाशीची शिक्षा ठोठावली आहे. २८ जून २०१५ रोजी तेल्हारा तालुक्यात मालपुरा इथं द्वारकाबाई तेलगोटे हिनं तिचा पती हरिभाऊ तेलगोटे आणि मुलगा श्याम तेलगोटे यांच्या मदतीने धनराज चऱ्हाटे आणि बाबुराव चऱ्हाटे या दोघांची आणि त्यांच्या दोन मुलांची हत्या केली होती. न्यायालयाने २१ जणांच्या साक्षी आणि पुरावे तपासून काल या तिघांना फाशीची शिक्षा सुनावली.

****

अवैध गर्भपात प्रकरणी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या सिल्लोड इथून डॉ. रोशन ढाकरे याला पोलिसांनी काल ताब्यात घेतलं. गर्भलिंगनिदानाची चाचणी करणाऱ्या एका तरुणीला छत्रपती संभाजीनगरमध्ये गेल्या रविवारी अटक करण्यात आली होती, गर्भलिंग निदान झाल्यानंतर ढाकरे याच्या दवाखान्यात गर्भपात होत असल्याचं, तपासात समोर आल्यानंतर काल पोलिसांनी ही कारवाई केली.

दरम्यान, जिल्ह्यातल्या नायगाव इथं अवैध गर्भलिंग निदान आणि गर्भपात प्रकरणी फरार असलेली आशा कार्यकर्ती वैशाली जाधव हिच्यासह दोघांना पोलिसांनी काल अटक केली. वैशाली राहत्या घरातच अवैध गर्भलिंग निदान आणि गर्भपात केंद्र चालवत होती. गेल्या ३१ जानेवारीला पोलिसांनी या केंद्रावर छापा मारुन गुन्हा दाखल केल्यापासून ती फरार होती.

****

लातूर शहरातले अवैध तसंच खाजगी मालमत्तांवरील जाहिरात फलक उद्यापर्यंत काढण्यात यावेत, अन्यथा संबंधितांवर कारवाईचा इशारा, महानगर पालिकेच्यावतीनं देण्यात आला आहे. मुंबईतल्या घाटकोपर दुर्घटनेनंतर कालपर्यंत शहरातले १६ फलक निष्कासित करण्यात आले आहेत. दरम्यान घाटकोपर फलक दुर्घटनेप्रकरणी मुख्य आरोपी भावेश भिंडे याला २६ मे पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

****

छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी काल मान्सूनपूर्व तयारीचा तसंच खरीप हंगामाच्या नियोजनासंदर्भात आढावा घेतला. पावसाळापूर्व उपाययोजनांची कामं येत्या एक जूनपर्यंत पूर्ण करावीत, असे निर्देश स्वामी यांनी सर्व यंत्रणांना दिले आहेत.

त्याचबरोबर शेतकऱ्यांनी पीक कर्ज उपलब्धतेसाठी कर्ज नूतनीकरण करुन घ्यावं, तसंच बँकांनी पीक कर्ज प्रकरणं संवेदनशीलतेने हाताळावीत अशी सूचना त्यांनी खरीप हंगाम आढावा बैठकीत केली.

****

धाराशिव जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असला तरीही पाणीटंचाईच्या झळा जाणवत आहेत. याबाबत आमचे प्रतिनिधी देविदास पाठक यांनी घेतलेला हा आढावा...

> ***धाराशिव जिल्ह्यात मे महिन्यात उन्हाची तीव्रता वाढत आहे. एकीकडे अवकाळी पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाल्यामुळे उष्णतेच्या झळा कमी झाल्या असल्या तरीही पाणीटंचाईच्या झळा अजूनही वाढलेल्याच आहेत. जिल्ह्यातल्या ९० गावात १३२ टँकर्सच्या सहाय्याने पाणीपुरवठा केला जात असून ४४७ गावात ८३२ विहिरी आणि विंधन विहिरींच्या अधिग्रहणातून पाणीपुरवठा होत आहे.***

*यात सर्वाधिक ४० टँकर भूम तालुक्यात तर चार टँकर तुळजापूर तालुक्यात सुरू आहेत.*

*धाराशिव जिल्ह्यातील २२६ सिंचन प्रकल्पांपैकी ७१ प्रकल्प कोरडे पडले असून १०६ प्रकल्पात जोत्याखाली तर ३४ प्रकल्पात २५% पेक्षा कमी पाणीसाठा शिल्लक राहिला आहे.*

*देविदास पाठक, आकाशवाणी वार्ताहर, धाराशिव*

****

थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीत भारताच्या सात्विक साईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य-पूर्व फेरीत काल त्यांनी मलेशियाच्या जोडीचा पराभव केला. त्यापूर्वी महिला दुहेरीत अश्विनी पोनप्पा आणि तनिषा क्रास्टो यांनी देखील दक्षिण कोरियाच्या जोडीचा पराभव करत उपांत्य फेरीत गाठल आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं महात्मा गांधी मिशन आणि मराठवाडा आर्ट अँड कल्चर फिल्म फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिगिषा नाट्य सहवास महोत्सवाला कालपासून प्रारंभ झाला. प्रसिद्ध रंगकर्मी धनंजय सरदेशपांडे यांना काल नाट्य चित्रपट अभिनेते प्राध्यापक दिलीप घारे यांच्या हस्ते मिलिंद सफई स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आला. तो राजहंस एक या नाटकाचा प्रयोग यावेळी सादर करण्यात आला.

****

श्री तुळजाभवानी देवस्थान दानपेटी घोटाळा प्रकरणी १६ दोषींवर तुळजापूर पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश न्यायालयानं दिले आहेत. न्यायालयाच्या या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करावी, अशी मागणी हिंदू जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड संघटक सुनील घनवट यांनी केली आहे. ते काल धाराशिव इथं पत्रकार परिषदेत बोलत होते.

****

हिंगोली जिल्ह्यात वसमत तालुक्यातल्या पळसगाव पाटीजवळ गावठी पिस्तुल बाळगणाऱ्या दोघांना गुन्हे शाखेच्या पथकानं काल ताब्यात घेतलं. त्यांच्याकडून एक पिस्तुल आणि एक जिवंत काडतुस ताब्यात घेण्यात आलं.

****

छत्रपती संभाजीनगर शहरात दुचाकीवरुन ५० लाख रुपये रोकड घेऊन जाणाऱ्या दोघांना पोलिसांनी काल पकडलं. हा पैसा हवाला प्रकरणातला असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

****

नांदेड जिल्ह्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे नवीन पाच इंटरसेप्टर वाहनं दाखल झाली आहेत. यामुळे या कार्यालयाकडे इंटरसेप्टर वाहनांची संख्या आता सात झाली आहे. या वाहनांच्या सहाय्याने प्रत्येक तालुक्यात वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यात येणार आहे.

****

हवामान

मराठवाड्यात नांदेड, लातूर, धाराशिव, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यात पुढचे पाच दिवस वादळी वारा, तसंच विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. आजपासून विभागाच्या तापमानातही तीन ते चार अंश सेल्सियसने वाढ होण्याची शक्यता असल्याचं, परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या हवामान विभागाने कळवलं आहे.

****

शेतकऱ्यांनी एक जूनपर्यंत कापसाची लागवड करु नये, असं आवाहन, बीड कृषी विभागाच्यावतीनं करण्यात आलं आहे. कपाशीवरील शेंदरी बोंडअळीच्या नियत्रंणासाठी ही खबरदारी घ्यावी असं विभागातर्फे सांगण्यात आलं आहे.

****

निझामाबाद - पंढरपूर एक्सप्रेस आज निजामाबाद-मुदखेड दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे. दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागीय कार्यालयानं ही माहिती दिली.

****